**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies,**
*Online ISSN 2278-8808, SJIF 2016 = 6.17, www.srjis.com*
*UGC Approved Sr. No.49366, MAR–APR, 2018, VOL- 5/44*

# शालेय व्यवस्थापन अध्यापनात अग्रत संघटक व भूमिकापालन प्रतिमानाच्या परिणामकारकतेचा अभ्यास

**ज्योत्स्ना मोहन कांबळे, Ph. D.**

*सहायक प्राध्यापक, टिळक शिक्षण महाविद्यालय*

*Email- jotsnasonawane@gmail.com*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

## 1.1 प्रस्तावना

शिक्षणाशिवाय कोणाचीही प्रगती होऊ शकणार नाही असे थोर शिक्षणतज्ञ व समाज सुधारक महात्मा फुले यांनी ऋष व्या शतकात समाजाची दुरावस्था पाहून वास्तव लिहून ठेवले. शिक्षणावरच राष्ट्राचा विकास अवलंबून असतो. या विकासामध्ये शिक्षकाची भूमिका अधिक महत्त्वाची आहे. सर्वांगिण विकास हे शिक्षणाचे महत्त्वाचे ध्येय आहे. विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास साधायचा असेल तर शिक्षक का गुणवत्ताधारकच असला पाहिजे. "दर्जेदार शिक्षणाला आवश्यक असलेली गोष्ट म्हणजे दर्जेदार शिक्षक" तरच चांगले नागरिक निर्माण होऊ शकतील. (शिंदे डी, 2010, पान नं. 33)

शिक्षकाच्या शिक्षणास भारतात अतिशय महत्त्वाचे स्थान प्राप्त झाल्याचे दिसून येते. उत्तेजन, सहाय्यता, आणि प्रेरणा या त्रयीने वातावरण निर्माण केल्यास शिक्षकास यथार्थ आणि नवनिर्माणाधीन दृष्टीने काम करणे अवघड जाणार नाही. यासाठी समाज व पर्यायने शासन यांची भूमिका निर्णायक ठरते. शिक्षकाची नेमणूक करताना पारदर्शकता आणणे गरजेचे ठरते. शिक्षकाची ज्याप्रमाणे व्यावसायिक जबाबदारी असते तितकीच त्यांची समाजाप्रती सामाजिक जबाबदारी असते हे विसरुन चालणार नाही. शिक्षकावर अशा प्रकारे व्यावसायिक आणि सामाजिक जबाबदारी ठेवण्याबरोबरच त्यांचे राहणीमान सुधारुन सामाजिक दर्जाही वाढला पाहिजे या साठी प्रयत्न होणे गरजेचे असते. म्हणून त्यांच्या दर्जानुसार व गुणवत्तेनुसार वेतनात आणि सेवा शर्तीत पारदर्शकता आणणे गरजेचे असते. खाजगी शैक्षणिक संस्थांनाही शासकीय ध्येय धोरणांचे व

*Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

सेवाशर्तीचे काटेकोरपणे पालन केल्यास योग्य बुदिधमान व्यक्ती शिक्षक पेशाकडे आकर्षित होतील. या पेशात शिक्षकांचा प्रामाणिकपणा व मानमर्यादा विचारात घेणे सोयीचे होईल. शिक्षकांचे व्यावसायिक नीतिनियम टिकवून ठेवण्यासाठी त्यांना नियम ठरवून देणे सोयी ठरेल. गुणवत्तापूर्ण शिक्षक निर्माण करण्यासाठी त्याला गुणवत्तापूर्ण प्रशिक्षण मिळणे आवश्यक आहे. प्रशिक्षण हे दोन प्रकारचे असते सेवापूर्व प्रशिक्षण व सेवांतर्गत प्रशिक्षण. विद्यार्थ्यांच्या जडणघडणीमध्ये सेवापूर्व प्रशिक्षणाचे महत्त्व अनन्य साधारण आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासाची जबाबदारी ही शिक्षकावर येते. जर त्याला गुणवत्तापूर्ण शिक्षण दिले गेले तर तो ही जबाबदारी यशस्वीपणे पार पाडू शकेल .सेवापूर्व प्रशिक्षणामध्ये शिक्षकाला अध्यापनाचे शास्त्रशुध्द ज्ञान मिळाले. प्रशिक्षणातून प्रामुख्याने अध्यापनाची नवीन तंत्रे, अध्यापन पध्दती अध्यापनाची प्रतिमाने इ.ची माहिती मिळाली तसेच अध्यापनाच्या विविध प्रतिमानांव्दारे अध्यापन केल्यास ते प्रभावी होते कारण विद्याथ्याना ते कंटाळवाने वाटत नाही. (थिगळे, इसावे, चव्हाण, पाटील, 2010, पान नं.24)

### 1.1.1 अग्रत संघटक प्रतिमान

अग्रत संघटक प्रतिमान हे माहिती प्रक्रियाकरण या कुलातील असून डेव्हीड असूबेल यांच्या अनिर्देशित अनुदेशन उपपत्तीवर आधारित आहे. असूबेल अध्यापनाच्या पध्दती सुधारून वापरण्यावर भर देतो. त्याच बरोबर जो घटक शिकवायचा असतो त्या घटकाची रचना केलेली आहे या गोष्टीला महत्त्वाचे स्थान देतो. म्हणजेच असूबेलच्यामते अध्ययन, अध्यापन व अभ्यासक्रम हे तीनही घटक सारखेच महत्त्वाचे आहेत. अग्रत संघटक प्रतिमानचा वापर करताना या तीनही घटकांना महत्त्व दिले आहे. विद्यार्थ्यासमोर अध्ययनासाठी आशय सादर केला जातो त्या आशयातील सर्व घदकांचे अध्ययन होईलच असे नाही मात्र जेंव्हा तो आशय सुसंघटीत करून सादर केला जातो तेंव्हा मात्र त्यातील जास्तीतजास्त भागाचे अध्ययन होते. आशयाचे संघटन करणे म्हणजे आशयातील विविध संकल्पना स्पष्ट करण्यासाठी त्या आशयातील विविध संबोधातील संबंध स्पष्ट करणे होय हे स्पष्ट करण्यासाठी एक विधान तयार करावे लागेल व ते विधान विद्यार्थ्यांना सादर करावे लागेल व ते विधान विद्यार्थ्यांना संकल्पना शिकविण्याआधी

Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

सादर करावे लागेल. अध्ययन प्रक्रिया सुरू होण्यापूर्वीच संघटक सादर करावयाचा असतो म्हणून त्याला अग्रत संघटक संबोधले जाते

**भूमिकापालन प्रतिमान**

**भूमिकापालन –** Role playing is a vehicle that forces people to take the rose of others'.

Role playing is a dealing with problems through action. A problem is delineated, acted out and discussed'. (Bruce Joyce and Marsha Weil- models of teaching)

भूमिका पालन शब्दातील भूमिका म्हणजे काय ते पुढीलप्रमाणे सांगता येईल. "कोणतीही व्यक्ति इतरांशी संबंध प्रस्थापित करण्यासाठी भावना, भाषा, कृती यांचा एकमेवाव्दितीय आणि अंगवळणी पडलेला एक वैशिष्टयपूर्ण आकृतीबंध वापरते. यालाच त्या व्यक्तिची भूमिका म्हणता येते." भूमिकापालन अध्यापन प्रतिमानाला वैयक्तिक तसे सामाजिक मिती आहेत. भूमिकापालनाव्दारे व्यक्तिंना सामाजिक जगतातील वैयक्तिक भूमिकांचे अर्थ समजू लागतात आणि सामाजिक समूहाच्या सहायाने संघर्ष सोडविण्यासाठी सहाय्य होते. सामाजिक परिस्थितीचे योग्य विश्लेषण करून इतरांशी सामंजस्याने वागणे, आंतरवैयक्तिक समस्या सोडविणे लोकशाही मार्ग अनुसरणे शक्य होते. (सोहनी 2009, पान नं. 175)

**शैक्षणिक व्यवस्थापन**

व्यवस्थापनाची तत्वे जेंव्हा विशिष्ट क्षेत्राच्या संदर्भात लागू केली जातात त्यावेळी त्यास त्याक्षेत्राचे व्यवस्थापन असे म्हणतात. व्यवस्थापनाची तत्वे ज्यावेळी शिक्षण क्षेत्राच्या संदर्भात लागू केली जातात त्यावेळी त्यास शैक्षणिक व्यवस्थापन असे मानले जाते. सध्याच्या काळात सर्वच क्षेत्रात व्यवस्थापनाची आवश्यकता निर्माण झालेली आहे. आज शिक्षण हा देखील एक उद्योग मानला गेला आहे. त्यामुळे या क्षेत्रातदेखील इतर क्षेत्रातील उद्योग–व्यवसायाप्रमाणेच उत्कृष्ठ व्यवस्थापन असणे आवश्यक आहे. शिक्षणक्षेत्रातदेखील ध्येयधोरण–उदिदष्टे निश्चिती, नियोजन, सुसूत्रीकरण, संचालन, नियंत्रण, अशा अनेक बाबींचा समावेश असतो. तसेच शिक्षक, विद्यार्थी, पालक, समाज व इतर व्यक्ती हे मानवी घटक व आवश्यक भौतिक घटक शिक्षणक्षेत्रात समाविष्ट असतात. त्यामुळे या क्षेत्रासही उत्कृष्ट व्यवस्थापनाची आवश्यकता आहे. "शैक्षणिक व्यवस्थापन म्हणजे शैक्षणिक ध्येयधोरणांचा विकास करणे, अध्ययन–अध्यापनाच्या कामाला प्रेरणा

Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

देणे व शिक्षण प्रक्रियेतील मानवी व भौतिक घटनांची सुव्यवस्था करणे होय." शाळा हा शिक्षण या उद्योगातील प्रमुख व महत्त्वाचा घटक आहे. शाळांमधून सुरू असलेल्या कार्यांतूनच शिक्षणाची उदिदष्टे साध्य केली जात असतात. तेव्हा शिक्षणाची पूर्वनिर्धारित उदिदष्टे, शाळेचे स्थैर्य व प्रगती या गोष्टी साध्य करण्यासाठी शाळेचे, शाळेतील कार्याचे व्यवस्थापन उत्तम होणे आवश्यक आहे शाळा ही समाजाची छोटी प्रतिकृती असून समाजाने निर्माण केलेली एक संस्था आहे. औपचारिकरित्या भावी पिढीला ज्ञान देऊन त्यांना जीवन जगण्यास समर्थ बनविणे असे शालेय कार्याचे स्वरूप असते. हे कार्य योजनाबध्दरीतीने व कल्पकतेने होण्यासाठी शालेय कार्याचे योग्य व्यवस्थापन होणे गरजेचे आहे.

## 1.2 संशोधन अभ्यासाची गरज

- शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील प्राध्यापक हे प्रामुख्याने व्याख्यान पध्दतीने अध्यापन करतात.
- पारंपारिक पध्दतीने अध्यापन केल्यामुळे प्रशिक्षणार्थिंना आशय समजताना अनेक अडचणी येतात.
- शाळेतील शिक्षक हे दैनंदिन अध्यापनामध्ये अध्यापन प्रतिमानांचा वापर करत नाही.
- भावी काळातील शिक्षकांनी त्यांच्या दैनंदिन अध्यापनामध्ये अध्यापन प्रतिमानांचा वापर करावा यासाठी विद्यार्थी–शिक्षकांना प्रतिमानाव्दारे अध्यापन करताना अध्ययन–अध्यापन प्रक्रिया कशी चालते याचा अनुभव मिळण्यासाठी.
- शिक्षक प्रशिक्षणात या प्रतिमानाचा वापर केल्याने संपादन वाढ होण्यासाठी.
- शाळेचा दर्जा सुधारायचा असेल तर शालेय व्यवस्थापन चांगल्या पध्दतीने समजणे आवश्यक आहे तरच त्याची अंमलबजावणी योग्य पध्दतीने करता येऊ शकते व शाळेचा दर्जा सुधारावयास मदत होऊ शकेल यासाठी.
- शिक्षकाला नेतृत्व, शिक्षणाशी संबंधित अनेक संस्था व त्यांची कार्यपध्दती, शाळेशी व विद्यार्थ्यांशी संबंधित विविध समस्या, मानवी आणि शैक्षणिक गरजा, प्रशिक्षण, संशोधन, नियोजन, संघटन, भौतिक सुविधा, विविध अधिकाऱ्याची कार्यपध्दतीची माहिती, विविध नियमांची माहिती, वेगवेगळया लोकांशी आंतरक्रिया साधने अशा अनेक गोष्टींचा शालेय

Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

व्यवस्थापनात समावेश होतो. त्यामळे शालेय व्यवस्थापन उत्कृष्ट असावे लागते व ते चांगल्या पध्दतीने समजण्यासाठी म्हणून हे संशोधन गरजेचे आहे.

- संशोधिका गेली पंधरा वर्षे शिक्षण प्रशिक्षण महाविद्यालयात कार्यरत असून या विषयामध्ये विद्यार्थ्यांना अनेक अडचणी येत आहे असे दिसून आले. विद्यार्थ्यांना कार्यपध्दतीची माहिती लक्षात येत असून विद्यार्थ्यांचे मूल्यमापन करताना यामध्य अनेक चूका आढळून येतात म्हणून संशोधिकेने या संशोधन समस्येची निवड केली.

**1.3 संशोधन अभ्यासाचे महत्व**

- अग्रत संघटक प्रतिमानाचा व भूमिकापालन प्रतिमानाचा वापर केल्यामुळे अध्ययन प्रभावी होऊन, अध्यापनाचा दर्जा सुधारण्यास मदत होईल.
- अध्यापन प्रतिमान वापरण्यासाठी प्रोत्साहन मिळेल.
- भावी शिक्षक शाळेमध्ये त्यांच्या दैनंदिन अध्यापनात अध्यापन प्रतिमानांचा वापर करतील.
- अध्ययन–अध्यापन प्रक्रिया चांगली घडून येण्यासाठी वातावरण निर्मितीची आवश्यकता असते हे विद्यार्थी–शिक्षकांच्या लक्षात येईल.
- प्रभावी अध्यापना बरोबरच प्रभावी प्रशासकासाठी आवश्यक बाबी लक्षात येतील.
- शालेय दर्जा सुभारण्यासाठी विद्यार्थ्यांच्या संपादनामध्ये वाढ होणे आवश्यक आहे हे कळल.

**1.4. संशोधनाचे शीर्षक**

शालेय व्यवस्थापन अध्यापनात अग्रत संघटक व भूमिकापालन प्रतिमानाच्या परिणामकारकतेचा अभ्यास.

**1.5. समस्या विधान**

पुणे शहरातील शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील बी.एड ला शिकविल्या जाणाऱ्या ‘शालेय व्यवस्थापन तत्वे व प्रात्यक्षिक’ विषयाच्या निवडक घटकांच्या अध्यापनात अग्रत संघटक प्रतिमान व भूमिकापालन प्रतिमान यांच्या परिणामकारकतेचा अभ्यास करणे.

Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

**1.6. संकल्पनात्मक व कार्यात्मक व्याख्या**

**संकल्पनात्मक व्याख्या**

**शिक्षणशास्त्र महाविद्यालय–** अध्यापक महाविद्यालय यास शिक्षणशास्त्र महाविद्यालय असे म्हणतात. या संस्थेत पदवीधर व्यक्तीसाठी (शाळेतील विषय घेतलेल्या) प्रशिक्षणाची सोय केलेली असते. अशा महाविद्यालयातून प्रशिक्षणाची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर त्यांना बी.एड ही पदवी देतात. (सोहनी,शैक्षणिक टिपाकोष, पान नं. 6)

**शालेय व्यवस्थापन –** शैक्षणिक उदिदष्टे साध्य करण्यासाठी भौतिक साधने व सुविधा आणि मानवी संसाधनांची जुळवाजुळव करून या दोन्ही घटकांत समन्वय साधून उदिदष्टांपर्यंत पोहोचण्यासाठी निर्माण करण्यात आलेली यंत्रणा म्हणजे शालेय व्यवस्थापन होय.(जाधव., माने., शालेय व्यवस्थापन 2004 पान नं.3)

(शालेय व्यवस्थापन म्हणजेच शैक्षणिक व्यवस्थापन हा बी.एड अभ्यासक्रम 2008 – Course code B.Ed 103 – शालेय व्यवस्थापन – तत्वे व प्रात्यक्षिक हा विषय)

**अग्रत संघटक –** "अध्ययन साहित्यापेक्षा अग्रत संघटक हा उच्च पातळीचा, अमुर्त, सामान्यीकृत आणि सर्व समावेशक असतो तो अध्ययन साहित्याच्या पूर्वी सादर केला जातो.त्याचा हेतू नवीन अध्ययन साहित्य आणि ज्ञात अध्ययन साहित्य यांच्यातील भेद स्पष्ट होण्यासाठी अध्ययनकर्त्याला मदत करणे आणि नवीन अध्ययन साहित्याचे जुन्या अध्ययन साहित्याशी संबंध जोडणे, एकात्मिकरण करणे हा असतो." (असुबेल डी. पी.1968) (संजीनवी महाले, अध्यापनाची प्रतिमाने आणि अध्ययन शैली, पान नं.81)

**भूमिकापालन –** भूमिकापालनामध्ये व्यक्ती इतरांच्या भूमिका साकारते. एखादया समस्येचे वर्णन करणे, विविध भूमिका साकारून ती समस्या सादर करणे आणि नंतर त्या सादरीकरणावर चर्चा करणे. (Bruce Joyce & Marsha Weil, Models of Teaching) (पाटील गितांजली, पान नं.9)

**कृती कार्यक्रमांची विकसन –** खरे अनुभव व ज्ञान कृतीकृतीमधून प्राप्त होते,कृती अनुभूतींना मूर्त स्वरूपात प्रकट करते . कूतीतून शिक्षण कृती कार्यक्रम ही पध्दतशीर चालणारी प्रक्रिया

Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

आहे ज्यामध्ये कार्यक्रमाची पध्दतशीर मांडणी केलेली असते . (http://google.co.co.in/Search?h-program= development.)

**परिणामकारता –** अध्यापन परिपाक म्हणून पूर्व निश्चित उदिदष्टाप्रत विद्यार्थ्यांनी केलेली प्रगती म्हणजे परिणामकारकता होय. (जगताप, 2010 पान. 10)

**कार्यात्मक व्याख्या**

**शिक्षणशास्त्र महाविद्यालय –** पदवी शिक्षणानंतर माध्यमिक शाळातील शिक्षकांसाठी सेवापूर्व प्रशिक्षण देणारी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी सलग्नीत पुणे शहरातील अनुदानित महाविद्यालय.

**शालेय व्यवस्थापन –** शालेय व्यवस्थापन म्हणजे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या 2008 च्या बी.एड अध्यासक्रमातील समाविष्ट असलेला Course code B.Ed -103 – School management– principal & practices (शालेय व्यवस्थापन – तत्वे व प्रात्यक्षिक) (2014- Course code B.Ed 103 – Quality and management of school education- Issues and Concerns, 2015- Course code B.Ed 201- Quality and management of School Education) हा विषय होय.

**घटक निश्चिती–** प्राध्यापकांकडून बी.एड अभ्यासक्रमातील शालेय व्यवस्थापन या विषयावर आधारित पडताळासूचीला दिलेल्या प्रतिसादावरून अध्यापनासाठी निश्चित केलेले घटक.

**अग्रत संघटक प्रतिमान –** डेव्हिड असुबेल यांनी विकसित केलेले प्रतिमानाच्या पदबंधावर आधारित निवडक घटकांवर विकसित केलेला कृतिकार्यक्रम.

**भूमिकापालन प्रतिमान –** जॉर्ज आणि फॅनी शॅफ्टेल यांनी विकसित केलेले प्रतिमानाच्या पदबंधावर आधारित निवडक घटकांवर विकसित केलेला कृतिकार्यक्रम.

**कृती कार्यक्रमाचे विकसन –** बी.एड प्रशिक्षणार्थींच्या शालेय व्यवस्थापन – तत्वे व प्रात्यक्षिक या विषयाचे अध्यापन करण्यासाठी संशोधिकेने तयार केलेला कृतीकार्यक्रम, ज्यामध्ये निवडक घटकांचे अग्रत संघटक प्रतिमान व भूमिकापालन प्रतिमान यांच्या पदबंधानुसार तयार केलेली पाठटाचणे म्हणजे कृतीकार्यक्रम विकसन.

Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

**परिणामकारकता–** बी.एड प्रशिक्षणार्थींना अग्रत संघटक प्रतिमान व पारंपारिक पध्दत आणि भूमिकापालन प्रतिमान व पारंपारिक पध्दत यांच्या सहाय्याने 'शालेय व्यवस्थापन – तत्वे व प्रात्यक्षिक' या विषयाच्या अध्यापनात कृती कार्यक्रमाची अंमलबजावणी केल्यानंतर उत्तर चाचणीच्या गुणांच्या मध्यमानात दिसून येणारा फरक म्हणजे परिणामकारकता होय.

**1.7 संशोधनाची उदि्दष्टे**

- शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील अध्यापन प्रतिमानांच्या वापरा संदर्भात सद्यस्थितीचा माहिती घेणे.
- शिक्षणशास्त्र पदवी अभ्यासक्रमातील शालेय व्यवस्थापन या विषयातील अग्रत संघटक प्रतिमानुसार व भूमिकापालन प्रतिमानानुसार अध्यापन करण्यासाठी घटकांची निश्चिती करणे.
- निवडक घटकांसाठी कृती कार्यक्रमाचे विकसन करणे.
- अग्रत संघटक प्रतिमान व भूमिकापालन प्रतिमानाव्दारे केलेल्या अध्यापनाची परिणामकारकता तपासणे.

**1.8 संशोधनाची गृहितके**

- शिक्षणशास्त्र महाविद्यालयामध्ये पारंपारिक पध्दतीचा अधिक वापर करतात. (नागमोती, देसले, पान नं. 88)
- अध्यापनाची प्रतिमाने वर्गातील अध्ययन–अध्यापन प्रक्रियेसाठी आवश्यक वातावरण निर्मिती करतात. (नागमोती, देसले, पान नं. 125)
- बी.एड च्या विषयामध्ये अग्रत संघटक प्रतिमानाव्दारे अध्यापन करता येते. (बुध्दीसागर एम –1987)
- वर्गाध्यापनामध्ये प्रत्यक्ष जीवनामधील प्रसंगाची उभारणी करणे शक्य असते. भूमिकापालनाने अध्ययन

  व अध्यापन मनोरंजक होते. भूमिकापालन सर्व वयोगटाच्या विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त ठरते. (पाटील–2007, संगिता देशमुख –2015)

Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

**1.9 परिकल्पना**

- **संशोधन परिकल्पना**

1. अग्रत संघटक प्रतिमानाव्दारे अध्यापन केल्यानंतर विद्यार्थ्यांच्या संपादनात व पारंपारिक पध्दतीने अध्यापन केल्यानंतर विद्यार्थ्यांच्या संपादनात प्रायोगिक गटाच्या उत्तर चाचणीतील गुणांच्या मध्यमानात वाढ होते.(उदिदष्ट क्र. 4)
2. भूमिकापालन प्रतिमानाव्दारे अध्यापन केल्यानंतर विद्यार्थ्यांच्या संपादनात व पारंपारिक पध्दतीने अध्यापन केल्यानंतर विद्यार्थ्यांच्या संपादनात प्रायोगिक गटाच्या उत्तर चाचणीतील गुणांच्या मध्यमानात वाढ होते.(उदिदष्ट क्र.4)

- **शून्य परिकल्पना**

1. अग्रत संघटक प्रतिमानाव्दारे अध्यापन केल्यानंतर विद्यार्थ्यांच्या संपादनात व पारंपारिक पध्दतीने अध्यापन केल्यानंतर विद्यार्थ्यांच्या संपादनात प्रायोगिक गटाच्या उत्तर चाचणीतील गुणांच्या मध्यमानात सार्थ फरक पडत नाही.
2. भूमिकापालन प्रतिमानाव्दारे अध्यापन केल्यानंतर विद्यार्थ्यांच्या संपादनात व पारंपारिक पध्दतीने अध्यापन केल्यानंतर विद्यार्थ्यांच्या संपादनात प्रायोगिक गटाच्या उत्तर चाचणीतील गुणांच्या मध्यमानात सार्थ फरक पडत नाही.

**1.10 संशोधनाची व्याप्ती**

प्रस्तुत संशोधन हे महाराष्ट्रातील सर्व शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील बी. एड चे विद्यार्थी व बी.एड ला शिकविणारे पाध्यापक यांच्याशी संबंधित आहे.

**1.11 संशोधनाची मर्यादा**

- प्रशिक्षणार्थिंच्या प्रेरणा, थकवा, आवड, पूर्वानुभव, वृत्ती, कल यांचा प्रतिसादावर होणाऱ्या परिणामांचा येथे विचार केला जाणार नाही.
- प्रशिक्षणार्थिंनी संपादित केलेल्या गुणांवर संशोधिकेचे नियंत्रण असणार नाही.
- विद्यार्थ्यांच्या भावनिक,मानसिक अवस्थेचा त्याच्या अध्ययनावर होणारा परिणाम संशोधिकेच्या नियंत्रणाबाहेर आहे

*Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

- प्रयोग चालू असताना वेळ व दिवसाच्या बदलानुसार पडणारा फरक संशोधिकेच्या नियंत्रणाबाहेर आहे.
- प्रस्तुत संशोधनातील निष्कर्ष हे प्रतिसादकांनी दिलेल्या प्रतिसादावर अवलंबून असतील.

**1.12 संशोधन परिमर्यादा**

- प्रस्तुत संशोधन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र पदवी अभ्यासक्रमातील
- सदर संशोधन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र पदवी अभ्यासक्रमाच्या सन 2008 च्या अभ्यासक्रमा पुरतेच मर्यादित आहे.
- सदर संशोधन हे शैक्षणिक वर्ष 2013-2014 पुरतेच मर्यादित आहे.
- प्रस्तुत संशोधन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र पदवी अभ्यासक्रमातील शिकविणाऱ्या व शालेय व्यवस्थापन – तत्वे व प्रात्यक्षिक हा विषय शिकविणाऱ्या प्रशिक्षकांपुरतेच मर्यादित आहे.
- प्रस्तूत संशोधनासाठी प्रश्नावली, पडताळासूची, प्रतिसाद शोधिका व संपादन चाचणी संशोधिका निर्मित व अप्रमाणित आहे.
- सदर संशोधन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पुणे शहरातील दोन बी. एड अनुदानित शिक्षणशास्त्र महाविद्यायातील बी.एड वर्गाच्या मराठी माध्यमातील विद्यार्थ्यां पुरतेच मर्यादित आहे.
- सदर संशोधन शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या बी.एड अभ्यासक्रमातील शालेय व्यवस्थापन– तत्वे व प्रात्यक्षिक या विषयातील निवडलेल्या घटकांपुरतेच मर्यादित आहे.
- प्रस्तूत संशोधनामध्ये अग्रत संघटक प्रतिमान व भूमिकापालन प्रतिमान यासाठी निवडलेले घटक पूर्णतः वेगळे असून दोन्ही प्रतिमानांची एकमंकांबरोबर तुलना केलेली नाही.

**संशोधन पध्दती :** प्रस्तुत संशोधनात संशोधकाने बहुविध संशोधन पध्दतीचा वापर केला आहे.

**1.13 संशोधनातील चले :**

**स्वाश्रयी चल :** अग्रत संघटक प्रतिमान व भूमिकापालन प्रतिमानाव्दारे अध्यापन करण्यासाठी विकसित केलेला कृतिकार्यक्रम

Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

**आश्रयी चल** : विद्यार्थ्यांचे प्राविण्य संपादन

**नियंत्रित चल** : चाचणी, विद्यार्थी संख्या, माध्यम, प्रयोजक.

**1.14 संशोधन अभिकल्प – केवळ उत्तर चाचणी समान गट अभिकल्प**

**1.15 माहिती संकलनाची साधने :**

प्रस्तुत संशोधनामध्ये प्रश्नावली, पडताळासूची, प्रतिसादक शोधिका, संपादन चाचणी या साधनांचा वापर केला आहे.

**1.16 संख्याशास्त्रीय साधने :**

संशोधनासाठी गोळा केलेल्या माहितीचे अर्थनिर्वचन व निष्कर्ष काढण्यासाठी शेकडेवारी, मध्यमान, प्रमाणविचलन, टी–परीक्षिका व माहिती सादरीकरणासाठी आलेख या सांख्यिकी तंत्राचा उपयोग केला.

**1.17 ठळक निष्कर्ष**

1. शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील प्राध्यापक दैनंदिन अध्यापनामध्ये अभ्यापन प्रतिमानाचा वापर करतात. (उदिदष्ट क्र 1)
2. 'शालेय व्यवस्थापन – तत्वे व प्रात्यक्षिक' या विषयातील उपघटकांचे अगंत संघटक प्रतिमान व भूमिकापालन प्रतिमानाच्या सहाय्याने अध्यापन करता येते. (उदिदष्ट क्र 2)
3. संशोधकाने तयार केलेल्या प्रतिमानाव्दारे अध्यापना कृतीकार्यक्रमाबददलचे तज्ज्ञांचे मत सकारात्मक आहे. (उदिदष्ट क्र 3)
4. अध्यापनासाठी पारंपारिक पध्दतीपेक्षा अग्रत संघटक प्रतिमान हे जास्त प्रभावी आहे. (उदिदष्ट क्र 4)
5. अध्यापनासाठी पारंपारिक पध्दतीपेक्षा भूमिकापालन प्रतिमाना हे जास्त प्रभावी आहे. (उदिदष्ट क्र 4)

**1.18 संबधित संशोधन व प्रस्तूत संशोधनातील निष्कर्षांची चर्चा**

1. बुदधीसागर एम. यांनी बो. एड विदयार्थ्यांच्या संदर्भात शैक्षणिक मानसशास्त्र विषय शिकविताना अग्रत संघटक प्रतिमानावर आधारित व अभिजात अभिसंधानासाठीच्या वापरासाठी अध्यापन

Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

साहित्य तयार केलेले आहे. त्यांच्या संशोधनामध्ये अग्रत संघटक प्रतिमान व PLM आणि पारंपारिक अध्यापन पध्दतीचा समान परिणाम दिसून आला. संशोधिकेने केलेल्या संशोधनातील निष्कर्षामध्ये प्रामुख्याने अग्रत संघटक प्रतिमान व भूमिकापालन प्रतिमान प्रभावी दिसून आले.

2. संबंधित संशोधन व प्रस्तूत संशोधनातील निष्कर्षांची तुलना संजीवनी महाले यांनी उदगामी विचार प्रतिमान आणि अग्रत संघटकावर आधारित स्वयंअनुदेशन साहित्याचा विद्यार्थ्यांच्या विविध अध्ययन पध्दतीवरील परिणामाचा अभ्यास केलेला आहे. अग्रत संघटक प्रतिमान आणि उदगामी विचार प्रतिमान आणि स्वयंअनुदेशन साहित्य आशय संपादणूक आणि उच्चतम आशय अध्ययन पातळीबाबत समान परिणामकारक होती. संशोधिकेने केलेल्या संशोधनातील निष्कर्षामध्ये प्रमुख्याने विदयार्थ्यांच्या संपादणूकीवर अग्रत संघटक प्रतिमानाव्दारे केलेल्या अध्यापनाचा प्रभावी परिणाम दिसून आला तसेच भूमिकापालन प्रतिमानाव्दारे केलेल्या अध्यापनाचा प्रभावी दिसून आले.
3. संगिता देशमुख यानी केलेल्या संशोधनामध्ये भूमिकापालन प्रतिमानाचा सकारात्मक परिणाम दिसून आला तसे सदर संशोधनातील भूमिकापालन प्रतिमानाचा प्रभावी परिणाम दिसून आला. तसेच विदयार्थ्यांच्या संपादणूकीवर अग्रत संघटक प्रतिमानाव्दारे केलेल्या अध्यापनाचा प्रभावी परिणाम दिसून आला
4. वंदना जाधव यांनी केलेल्या संशोधनामध्ये विद्यार्थी शिक्षकांनी माध्यमिक स्तरावर अग्रत संघटक प्रतिमानाच्या सहाय्याने अध्यापन केले असता ते प्रभावी आहे असे दिसून आले. दर संशोधनामध्ये अग्रत संघटक प्रतिमान व भूमिकापालन प्रतिमानाव्दारे अध्यापन केल असता संपादनात वाढ दिसून आली

**1.19 शिफारशी–**

1. सर्व प्राध्यापकांनी दैनंदिन अध्यापनामध्ये विविध अध्यापन प्रतिमानांचा वापर करावा (उदिदष्ट क्र 1, निष्कर्ष क्र 1)

Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

2. **बी . एड अध्यासक्रमातील विविध विषयातील अग्रत संघटक प्रतिमान व भूमिकापालन प्रतिमानाच्या सहाय्याने अध्यापन करण्यासाठी उपघटकांचे विश्लेषण करून शोध घ्यावा (उदिदष्ट क्र 2, निष्कर्ष क्र 2)**
3. **बी एड अभ्यासक्रमातील सर्व विषयातील विविध घटकांवर आधारित कृतीकार्यक्रम विकसित करावा (उदिदष्ट क्र 3,)**
4. **बी. एड अभ्यासक्रमातील सर्व विषयांतील विविध घटकांसाठी अग्रत संघटक प्रतिमानाचा वापर करावा. (उदिदष्ट क्र 4, निष्कर्ष क्र 4)**
5. **बी. एड अभ्यासक्रमातील सर्व विषयांतील विविध घटकांसाठी भूमिकापालन प्रतिमानाचा वापर करावा. (उदिदष्ट क्र 4, निष्कर्ष क्र 4)**

**संदर्भसूची**

*पारसनीस न. रा.,(2008), शिक्षकांचे प्रशिक्षण, पुणे : नित्य नूतन प्रकाशन.*
*पंडित बी. बी.(1997), 'शिक्षणातील संशोधन', (प्रथमावृत्ती), पुणे : नूतन प्रकाशन.*
*भालेराव सु., चव्हाण शै., शिंदे प्र.,(2009), 'शालेय व्यवस्थापन : तत्त्वे व प्रात्यक्षिके', नाशिक : गणेशपुजा प्रकाशन.*
*भिंताडे, वि. रा.(2004), 'शैक्षणिक संशोधन पद्धती'( प्रथमावृत्ती), पुणे : नित्य नूतन प्रकाशन, पुणे.*
*महाले सं. रा (2005), 'अध्यापनाची प्रतिमाने व अध्ययन शैली', औरंगाबाद : युनिक पब्लिकेशन.*
*मुळे, रा. श., उमाठे, वि. तु.(1987) 'शैक्षणिक संशोधन पद्धती'( तिसरी आवृत्ती) औरंगाबाद , महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मीती मंडळ, औरंगाबाद*
*सोहनी, चि. रा. (२००६), 'अध्यापनाची प्रतिमाने' पुणे: नूतन प्रकाशन.*
*Best ,J,W. & Kahn, J.V.(2005), Research in Education, (fifth edition),New Delhi :Prentice -Hall of India Private Limited.*
*Bruce Joyce, Maershweil (1997) 'Models of teaching ' (fifth edition) , New Delhi: prentice Hall of India Private Limited.*
*Garret ,H. E. (2006) Statistics in Psychology and education cosmo publication for Genesis publication Pvt.Ltd. New Delhi*

*Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*